# प्रकरण पहिले

# प्रकरण पहिले

| | |
|---|---|
| १.१ | प्रस्तावना |
| १.२ | संशोधन समस्येचे शब्दांकन |
| १.३ | संशोधनाचे महत्त्व |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्टये |
| १.५ | संशोधनाची गृहितके |
| १.६ | संशोधनाची कार्यपध्दती |
| १.७ | संशोधनाची मर्यादा |
| १.८ | संशोधनाचे प्रकरणीकरण |
| १.९ | समारोप |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

**प्रस्तावना**

आधुनिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संप्रेषण हा एक आवश्यक घटक आहे. संप्रेषण हे लिखित, मौखिक, शाब्दिक किंवा आरेखित असू शकते. या सर्व माध्यमांचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. गतिमान समाजात संप्रेषण हा एक आवश्यक घटक बनला आहे. संप्रेषण घडण्यासाठी कमीत कमी दोन व्यक्तीची आवश्यकता असते. जेंव्हा एक व्यक्ती आपले विचार दुसऱ्या व्यक्तीला सांगते तेव्हा ती व्यक्ती तो विचार समजावून घेऊन आपली प्रतिक्रिया पहिल्या व्यक्तीला सांगते तेंव्हाच संप्रेषण योग्य होते.

संप्रेषण या शब्दाला इंग्रजी शब्द communication हा आहे. संप्रेषण कमीत कमी दोन व्यक्तीमध्ये होणे आवश्यक आहे. संप्रेषण व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूह-समूह यांच्यामध्ये चालते. वर्गात हे संप्रेषण विद्यार्थी-शिक्षक यांच्यामध्ये होत असते.

आज मातृभाषेला मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. मातृभाषेचा सुयोग्य उपयोग करता येणे हे प्रशिक्षणार्थ्यांचे कौशल्य आहे. त्यासाठी अध्ययन अध्यापनाची गरज असते. मराठीचे अध्यापन करण्यासाठी अध्ययनाची गरज असते. त्याचप्रमाणे मराठीचे अध्यापक हे कुशल प्रशिक्षक असावे लागतात. विद्यार्थ्यांना जो संदेश द्यावयाचा आहे तो त्यांना आकलन होईल अशा पध्दतीने पोहोचवून विद्यार्थ्यांकडून योग्य प्रतिसाद मिळतो की नाही हे पहाणे आवश्यक आहे. यासाठी काही क्रियांचा विचार अध्यापकाने करणे आवश्यक आहे.

१. आपण काय बोलावे याचा विचार करणे.

२. आपले म्हणणे उत्तमरीतीने कसे सांगता येईल त्याचा विचार करणे.

३. त्यासाठी योग्य शब्द शोधून काढणे.

४. आपण बोललेले दुसऱ्या व्यक्तीस समजले आहे किंवा नाही याची खात्री करुन घेणे.

५. दुसऱ्या व्यक्तीने दिलेला प्रतिसाद समजून घेणे.

६. दिलेल्या प्रतिसादाला अनुसरुन योग्य तो बदल घडविणे.

गेल्या तीन वर्षाच्या अनुभवाने संशोधिकेला मराठी प्रशिक्षणार्थ्यांकडे पुढील त्रुटी आढळून आल्या. मराठी शुध्द बोलणे, लिहिणे, वाचणे यांचा अभाव. तसेच विविध शैक्षणिक साधनांचा योग्य वापर न केल्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत संदेश पोहचू शकत नाही. बरेचदा भावना व्यक्त करण्यासाठी समर्पक शब्द सापडत नाहीत. प्रशिक्षकांचा आवाज कांहीवेळा मुलांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे योग्य विषय संप्रेषण होवू शकत नाही.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठात शिक्षणाचे माध्यम म्हणून प्रांतिक भाषांचा वापर करण्यात यावा या मुद्दयावर भर देण्यात आला आहे. त्रिभाषासूत्र कार्यान्वित करण्यासाठी जोरदार प्रयत्न, तसेच विविध शैक्षणिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांमध्ये सुधारणा करणे याचाही विचार केलेला आहे.

आज बी. एड्. प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थीना भाषिक कौशल्याच्या बाबतीत योग्य ते प्रशिक्षण मिळत नाही. त्यामुळे प्रशिक्षणार्थींच्या अध्यापनात शब्दावडंबर (verbosity) बोलण्याची पध्दती (verbalism), अस्पष्ट आरेखने, चिन्हे (unclear graphics &

symbols) या त्रुटी आढळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही या त्रुटी कायम राहतात. बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांमधील या त्रुटी ओळखून कमी करण्यासाठी व योग्य प्रकारे संप्रेषण होण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

## १.२ संशोधन समस्येचे शब्दांकन

मराठी अध्यापन पध्दती असलेल्या प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या भाषिक अडथळयांचा संप्रेषणावर होणारा परिणाम एक अभ्यास.

प्रस्तुत संशोधन विषयातील संज्ञांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे -

**मराठी अध्यापन पध्दती -**

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील बी. एड्. महाविद्यालयात अभ्यासक्रमासाठी असलेल्या हिंदी, मराठी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र इ. पैकी मराठी एक अध्यापन पध्दती.

**प्रशिक्षणार्थी**

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेतील बी. एड्. महाविद्यालयामध्ये १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी.

**भाषिक अडथळे**

मराठी या भाषेचे अध्यापन करीत असताना प्रशिक्षणार्थ्यांना येणाऱ्या भाषिक अडचणी.

**शब्दावंडबर** (verbosity)

पाल्हाळ लावणे, अनावश्यक शब्दांचा वापर करणे, अनेक शब्दांचा वापर केल्यामुळे ते शब्द अनाकर्षित, अभिरुचीहीन होतात. त्यामुळे त्या शब्दांची अध्ययन क्षमता कमी होते.

**बोलण्याची पध्दती** (verbalism)

शाब्दिक हावभाव, उच्चार, आवाजाची लय योग्य नसणे, भाषेमध्ये योग्य उच्चार येणे आवश्यक असते. आवाजामध्ये योग्य चढउतार नसेल तर परिणामकारक अध्यापन होणार नाही.

**अस्पष्ट आरेखने व चिन्हे** (unclear graphics & symbols)

एखाद्या आशयाचे हुबेहुब चित्रण, चित्र, आकृत्या यामधून न होणे, ते अस्पष्ट, अशुध्द असणे, एखाद्या कल्पनेचे प्रक्रियेचे द्योतक अस्पष्ट, अशुध्द असणे.

**संप्रेषण**

या प्रक्रियेत संकेताच्या आदानप्रदानाने प्रशिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात संबंध निर्माण होतात. त्यातून विद्यार्थ्यांस मराठी विषयात मिळालेले संपादीत गुण.

**परिणाम**

भाषिक अडथळयांचा संप्रेषणावर होणारा प्रभाव.

**अभ्यास**

संशोधनाचा काळजीपूर्वक शोध घेणे.

## १.३ संशोधनाचे महत्त्व

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. तसेच या राज्यात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा आहे. मातृभाषेच्या सामर्थ्यावर कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेले आकलन शक्ती व कौशल्ये यांचा विकास होण्यास मदत होते. सध्या श्रवण-भाषण कौशल्यापासून ते प्रतिभासंपन्न सृजनशीलतेपर्यंत प्रत्येक क्रियेत मातृभाषेची आवश्यकता आहे. मातृभाषा ही भावनिक विकासाचे आणि आत्म प्रकटीकरणाचे साधन आहे.

प्रस्तुत संशोधिकेची मराठी ही अध्यापन पध्दती आहे. त्याशिवाय ती गेली तीन वर्षे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्यापन करते. मातृभाषा मराठी हा तिच्या चिंतनाचा विषय आहे.

मराठी अध्ययन-अध्यापनाची सद्यःस्थिती फारशी समाधानकारक नाही. शिक्षक योग्य साधनांचा उपयोग व्यवस्थित करत नाहीत. त्याचबरोबर काही प्रशिक्षणार्थींचे उच्चार योग्य नसतात. अनावश्यक शब्दांचा जास्त वापर होतो. अडथळयांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संप्रेषण योग्य प्रकारे होवू शकत नाही. म्हणून प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या शाब्दिक अडथळयांची कारणे शोधून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी यांच्यामध्ये योग्य संप्रेषण होईल या दृष्टिकोनातून हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टये

१. मराठीचे अध्यापन करत असताना शब्दावडंबर, बोलण्याची पध्दती, अस्पष्ट आरेखने व चिन्हे या भाषिक अडथळयांची व्याप्ती ठरविणे.

२. मराठी अध्यापन पध्दती असलेल्या प्रशिक्षणार्थ्याला मराठी विषयाचा पाठ घेत असताना येणाऱ्या तीन भाषिक अडथळयांचे प्रमाण निरीक्षणाद्वारे निश्चित करणे.

३. पहिली अध्यापन पध्दती मराठी असणारे व दुसरी अध्यापन पध्दती मराठी असणाऱ्या प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या तीन भाषिक अडथळयांच्या प्रमाणावरुन तुलना करणे.

४. पहिली अध्यापन पध्दती मराठी असणारे व दुसरी अध्यापन पध्दती मराठी असणारे प्रशिक्षणार्थी मुले व मुली यांना येणाऱ्या तीन भाषिक अडथळयांची तुलना करणे.

५. प्रस्तावनेमध्ये दिलेले प्रश्न व मूल्यमापनाच्यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे यांच्या आधारे संप्रेषणाचे प्रमाण ठरविणे.

६. भाषिक अडथळे आणि संप्रेषणाचा दर्जा यांचा तौलनिक अभ्यास करणे.

७. भाषिक दर्जा वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.

## १.५ संशोधनाची गृहितके

१. मराठी अध्यापन पध्दती असलेले प्रशिक्षणार्थी भाषण, लेखन, वाचन कौशल्ये जाणतात.

२. प्रशिक्षणार्थ्यांनी कोणत्याही वर्गावर (स्तरावर) मराठीचा पाठ घेतला तरी भाषिक अडथळयावर परिणाम होत नाही.

## १.६ कार्यपध्दती

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत आहे. त्यामुळे संशोधनासाठी सर्व्हेक्षण पध्दती वापरली आहे. या पध्दतीच्या आधारे मिळालेल्या सामग्रीवरुन गुणात्मक विश्लेषण केले आहे.

**संशोधनाची साधने**

या संशोधनाला लागणारी सामग्री गोळा करण्यासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**१. निरीक्षण तक्ता**

मराठी अध्यापन पध्दती असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे पाठ निरीक्षण करुन तीन भाषिक अडथळे व संप्रेषणाचा दर्जा पाहिला.

**२. मुलाखत**

**अ) प्रशिक्षणार्थ्यांसाठी -**

प्रशिक्षणार्थींच्या अध्यापनात येणाऱ्या भाषिक अडथळयांची कारणे पाहण्यासाठी मराठी अध्यापन पध्दती असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.


**ब) मराठी अध्यापन पध्दतीचे अध्यापन करणारे शिक्षक प्रशिक्षकांसाठी -**

मराठी अध्यापन पध्दती शिकविणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकांच्या मुलाखती घेतल्या.

## नमुना निवड

संशोधनासाठी लागणारा नमुना शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या बी. एड्. महाविद्यालयात १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीमधून प्रासंगिक न्यादर्श पध्दतीने ४० प्रशिक्षणार्थी निवडले. एकूण ५६० जनसंख्येपैकी ८ टक्के नमुना निवडला.

**मराठी अध्यापन पध्दती असलेले विद्यार्थी**




## शिक्षक प्रशिक्षकांचा नमुना

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या बी. एड्. कॉलेजमधील मराठी अध्यापन पध्दती शिकविणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकांपैकी यादृच्छिक पध्दतीने ३६ टक्के नमुना (१०) शिक्षक प्रशिक्षकांची निवड करण्यात आली.

**कार्यपध्दती**

मराठी अध्यापन पध्दती असलेल्या प्रशिक्षणार्थींचे पाठ तीन मराठीचे प्राध्यापकांनी निरीक्षण केले आहे व तीन भाषिक अडथळे व संप्रेषणाचा दर्जा पाहिला.

प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या भाषिक अडथळयांची कारणे पाहण्यासाठी त्यांची मुलाखत घेतली. प्रशिक्षणार्थीना कोणत्या प्रकारचे अडथळे येतात व उपाययोजना यासाठी शिक्षक प्रशिक्षकांच्या मुलाखत घेतल्या.

## १.७ संशोधनाची मर्यादा

१. हे संशोधन शब्दावडंबर, बोलण्याची पध्दती, अस्पष्ट आरेखने व चिन्हे या भाषिक अडथळयांपुरतेच मर्यादित आहे.

२. हे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या बी. एड्. महाविद्यालयातील १९९६-९७ या शैक्षणिक वर्षातील ४० प्रशिक्षणार्थी व १० शिक्षक प्रशिक्षकांपुरते मर्यादित आहे.

३. हे संशोधन १९९६-९७ प्रशिक्षणार्थीच्या मराठी अध्ययनापुरतेच मर्यादित आहे.

## १.८ प्रकरणीकरण

संशोधनासाठी मुलाखत, निरीक्षणाद्वारे संकलीत केलेल्या सामुग्रीचे वर्गीकरण व पृथःकरण करुन आवश्यक ती परिमाणे वापरुन त्यावर आधारीत निष्कर्ष काढलेले आहेत. त्याचप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत. त्या सर्वांचे भिन्न निर्देशीत प्रकरणात विभाजन केलेले आहे.

**प्रकरण पहिले - प्रस्तावना**

या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी तसेच संशोधनाची आवश्यकता याविषयी चर्चा केलेली आहे. तसेच समस्येचे शब्दांकन, स्वरुप, महत्त्व, व्याप्ती, मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत.

**प्रकरण दुसरे - संप्रेषण, अध्यापनातील तीन घटक**

या प्रकरणात संप्रेषणाची व्याख्या, अर्थ, संप्रेषण प्रक्रिया, संप्रेषण प्रक्रियेमध्ये येणारे अडथळे, संप्रेषणाच्या पध्दती, मार्ग तसेच शब्दावडंबर, बोलण्याची पध्दती, अस्पष्ट आरेखने व चिन्हे या तीन अडथळयांविषयी माहिती व याचा उपयोग संशोधनात कोणत्या प्रकारे केला याविषयी चर्चा केली आहे.

**प्रकरण तिसरे - संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा**

या प्रकरणामध्ये संशोधन समस्येशी निगडीत अशा प्रकाशित संशोधन साहित्याचे समालोचन केलेले आहे.

**प्रकरण चौथे - संशोधनाची कार्यपध्दती**

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या पध्दतींचा उल्लेख केलेला आहे. संशोधनासाठी नमुना निवड कशा पध्दतीने केलेली आहे हे सांगितले आहे. तसेच प्रकल्पासंबंधी कोणकोणत्या साधनाद्वारे माहिती मिळवली आहे. त्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण कशा प्रकारे केलेले आहे याची माहिती दिलेली आहे.

**प्रकरण पाचवे - माहिती विश्लेषण**

या प्रकरणामध्ये मुलाखत, निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण विश्लेषण करुन त्यावर आधारीत अन्वयार्थ लावण्यात आला आहे.

**प्रकरण सहावे - निष्कर्ष आणि शिफारशी**

संशोधन सामुग्रीच्या आधारे समस्येच्या वस्तुस्थितीचे निश्चितीकरण करुन निष्कर्ष काढलेले आहेत. काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे शिफारशीचा निर्देश करण्यात आला आहे व निश्चित उपाययोजना सुचविण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधन समस्येचे आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश करण्यात आलेला आहे.

**सारांश**

सदर प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी विशद करण्यासाठी यथायोग्य आराखडा दिलेला आहे. त्यामध्ये संशोधन विषयक परिचय, संशोधन समस्येचे विधान, संशोधन विधानात वापरलेल्या महत्त्वाच्या संज्ञांच्या व्याख्या, संशोधन समस्येचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधनाच्या मर्यादा आणि प्रकरणीकरण या बाबींची चर्चा केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये संशोधनाच्या विधानातील संकल्पनाविषयी माहिती दिली आहे.